जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 NOV 2024
लोकमत

दिवाळीत ध्वनिप्रदूषण : गतवर्षीपेक्षा पातळी मात्र कमी

# लक्ष्मीपूजनाला फटाक्यांचा आवाज मर्यादेपेक्षा जास्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** एकीकडे ध्वनिप्रदूषण कमी करण्यासाठी सातत्याने प्रबोधन केले जात असले तरी याचा तितकासा परिणाम नागरिकांवर होत नसल्याचे यंदाच्या दीपावली सणातून दिसून आले. यंदा कोल्हापूर शहरात लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर फटाक्यांचा आवाज मर्यादेपेक्षा जास्त वाढला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने शहरातील ४ क्षेत्रामधील २२ ठिकाणांचे ध्वनी मापन केले.

शांतताप्रवण क्षेत्र असलेल्या सीपीआर रुग्णालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा न्यायालय व शिवाजी विद्यापीठ या परिसरात लक्ष्मीपूजनादिवशी ६३.९ पासून ६६.६ डेसीबलपर्यंत आवाजाची मर्यादा गेली, तर व्यापारी क्षेत्र असलेल्या लक्ष्मीपुरी परिसरात ८७.४ पर्यंत आवाज वाढला. असे असले तरी गतवर्षीपेक्षा आवाजाची पातळी किंचित कमी राहिली. रहिवासी, व्यापारी, शांतता प्रवण व औद्योगिक या चार क्षेत्रांपैकी व्यापारी परिसरात आवाजाची मर्यादा सर्वांत जास्त राहिली. दरम्यान, शहरातील दोन ठिकाणे वगळता इतर सर्वच ठिकाणी आवाजाची पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानांकनापेक्षा जास्त राहिली.



## शांतता क्षेत्र

| परिसर | लक्ष्मीपूजन | पाडवा | भाऊबीज |
|---|---|---|---|
| सीपीआर | ६३.९ | ६६.७ | ५७.५ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ५६.६ | ५९.६ | ६०.२ |
| जिल्हा न्यायालय | ६८.७ | ६४.७ | ५९.५ |
| शिवाजी विद्यापीठ | ६६.६ | ६०.५ | ४२.६ |

## रहिवासी क्षेत्र

| परिसर | लक्ष्मीपूजन | पाडवा | भाऊबीज |
|---|---|---|---|
| शिवाजी पेठ | ८०.३ | ७०.४ | ६४.३ |
| मंगळवार पेठ | ८३.२ | ७३.९ | ५५.६ |
| उत्तरेश्वर पेठ | ८०.७ | ६४.९ | ६५.७ |
| राजारामपुरी | ७४.६ | ७०.९ | ७१.४ |
| नागाळा पार्क | ७६.९ | ८२.४ | ६२.९ |
| ताराबाई पार्क | ७९.२ | ७३.३ | ५९.० |



## शांतता क्षेत्र

| परिसर | लक्ष्मीपूजन | पाडवा | भाऊबीज |
|---|---|---|---|
| लक्ष्मीपुरी | ८७.४ | ८२.६ | ६६.२ |
| बिंदू चौक | ७५.५ | ८०.२ | ६९.० |
| मिरजकर तिकटी | ७६.७ | ८२.६ | ६७.८ |
| गुजरी कॉर्नर | ८७.५ | ७७.३ | ६६.६ |
| बिनखांबी मंदिर | ७२.६ | ७७.९ | ६५.६ |
| महाद्वार रोड | ८६.४ | ७०.४ | ६९.९ |
| पापाची तिकटी | ७८.५ | ६७.४ | ७२.५ |
| राजारामपुरी | ६९.७ | ७१.७ | ६९.४ |
| वाय. पी. पोवारनगर | ७४.६ | ७१.२ | ७०.२ |
| उद्यमनगर | ७३.३ | ७०.७ | ६६.३ |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 NOV 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे व्यावसायिक अभ्यासक्रम परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हिवाळी सत्रातील प्रथम वर्ष प्रथम सत्र फ्रेश विद्यार्थी व थेट द्वितीय वर्षाकरिता प्रवेशित विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रम परीक्षेच्या अर्ज भरण्यास १४ नोव्हेंबरपर्यंत मुदत आहे. विद्यार्थ्यांना विनाविलंब ते अतिविलंब शुल्कासह १४ ते २१ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरता येणार आहे. महाविद्यालय, पदव्युत्तर विभागाने परीक्षा अर्ज विद्यापीठात १६ ते २२ नोव्हेंबरपर्यंत जमा करणे गरजेचे आहे. विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र तारखा प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 NOV 2024
सकाळ

# विद्यापीठाचे संघ जम्मूला रवाना

## तलवारबाजी स्पर्धेसाठी पुरुष, महिला संघांची निवड

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : जम्मूमधील जम्मू विद्यापीठात ५ ते १० नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ पुरुष व महिला फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचे पुरुष व महिला संघ आज रवाना झाले.




कोल्हापूर : जम्मू येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठीय तलवारबाजी स्पर्धेसाठी सोमवारी रवाना झालेल्या महिला व पुरुष संघांसोबत डॉ. शरद बनसोडे, धनंजय पाटील, प्रफुल्ल धुमाळ उपस्थित होते.

ईपी, सेबर, फॉईल या प्रकारांत निवड झालेले खेळाडू असे : वंदना शर्मा (आक्काताई रामगोंडा कन्या महाविद्यालय, इचलकरंजी), यशश्री कदम, श्लोका शिंदे, श्रीशैल शिंदे (विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर), समृद्धी साळुंखे (जयसिंगपूर महाविद्यालय), अपूर्वा शिंदे (डीकेटीई, इचलकरंजी), श्रुती पटेल (विवेकानंद कॉलेज), अथर्व कर्नाळे (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज), श्रावण काटकर (तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी, वारणानगर), मानसी माळी, रितेश पोवार (महावीर कॉलेज), श्रीनिवास पाटील (गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली), श्रद्धा पोवार (महावीर कॉलेज), अथर्व यादव (नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज, सांगली), अवधूत पाटील (अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आष्टा), आर्यन पवार (श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली), सार्थक ढेरे (किसन वीर महाविद्यालय, वाई), सानिका मोरे (शहाजी कॉलेज, कोल्हापूर), सानिका हराळे (घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर).

खेळाडूंना डॉ. धनंजय पाटील व प्रफुल्ल धुमाळ यांचे प्रशिक्षण, तर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 NOV 2024
पुढारी



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेसाठी रवाना झालेला शिवाजी विद्यापीठाचा मुला-मुलींचा संघ. सोबत प्रशिक्षक-मार्गदर्शक.

# विद्यापीठाचा तलवारबाजीचा संघ रवाना

कोल्हापूर : जम्मू विद्यापीठ येथे होणाऱ्या अखिल भारतीय पुरुष व महिला फेन्सिंग (तलवारबाजी) आंतरविद्यापीठ स्पर्धांसाठी शिवाजी विद्यापीठाचा पुरुष व महिला संघ रवाना झाला. ईपी, सेबर व फॉईल या प्रकारांमध्ये संघातील खेळाडू सहभागी होणार आहेत. संघात वंदना शर्मा (श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी), यशश्री कदम, श्लोका शिंदे, श्रुती पटेल व श्रीशैल शिंदे (विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर), समृद्धी साळुंखे (जयसिंगपूर महाविद्यालय), अपूर्वा शिंदे (दत्ताजीराव इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट इचलकरंजी), अथर्व कर्नाळे (शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज), श्रावण काटकर (तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट वारणानगर), मानसी माळी, रितेश पोवार, श्रद्धा पोवार (महावीर महाविद्यालय कोल्हापूर), श्रीनिवास पाटील (गणपतराव आरवाडे कॉलेज सांगली), अथर्व यादव (नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज सांगली), अवधूत पाटील (अण्णासाहेब डांगे कॉलेज आष्टा), आर्यन पवार (श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज सांगली), सार्थक डेरे (किसन वीर महाविद्यालय वाई), सानिका मोरे (शहाजी महाविद्यालय), सानिका हराळे (गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय जयसिंगपूर) यांचा समावेश आहे. सर्वांना डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय), प्रफुल्ल धुमाळ आदींचे मार्गदर्शन लाभत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 NOV 2024
तरुण भारत

# फेन्सिंग स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ रवाना

प्रतिनिधी
कोल्हापूर

जम्मू विद्यापीठ जम्मू येथे ५ ते १० नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय पुरुष व महिला फेन्सिंग (तलवारबाजी) विद्यापीठ स्पर्धांसाठी शिवाजी विद्यापीठाचे पुरुष व महिला संघ रवाना झाले आहेत.

रवाना झालेल्या खेळाडूंमध्ये वंदना शर्मा श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, यशश्री कदम विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर, श्लोका शिंदे विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर, श्रीशैल शिंदे विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर, समृद्धी साळुंखे जयसिंगपूर महाविद्यालय,




**कोल्हापूर : जम्मू येथील अखिल भारतीय फेन्सिंग स्पर्धेसाठी रवाना झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.**

जयसिंगपूर, अपूर्वा शिंदे दत्ताजीराव कदम टेक्सटाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट,इचलकरंजी, श्रुती पटेल विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, अथर्व कर्नाळे शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, श्रावण काटकर तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी वारणानगर, मानसी माळी, रितेश पोवार महावीर महाविद्यालय

- **५ ते १० नोव्हेंबर दरम्यान जम्मू विद्यापीठात होणार स्पर्धा**

कोल्हापूर, श्रीनिवास पाटील सांगली, श्रद्धा पोवार महावीर महाविद्यालय, कोल्हापूर, अथर्व यादव नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्स सांगली, अवधूत पाटील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आष्टा, आर्यन पवार श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज सांगली, सार्थक डेरे किसन वीर महाविद्यालय वाई, सानिका मोरे शहाजी महाविद्यालय, सानिका हराळे श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर.